**<u>ठळक बातम्या</u>**

- ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्त्रोत असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उद्यापासून दोन दिवस जॉर्डनच्या दौऱ्यावर

- महाराष्ट्र विधिमंडळ अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस, अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला मुख्यमंत्र्यांचं उत्तर

- महाराष्ट्रात गोंदिया इथं ३ माओवाद्यांची शरणागती

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघादरम्यानचा तिसरा टी-ट्वेंटी सामना आज धरमशाला इथं रंगणार

<><><><><>

ऊर्जेची बचत करणं हाच ऊर्जेचा सर्वात पर्यावरणस्नेही आणि विश्वसनीय स्त्रोत आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनी केलं. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कारानं राष्ट्रपतींनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात सन्मानित केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. जगातल्या सर्वाधिक वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी भारत एक असून विकासाच्या या यात्रेत सर्व नागरिकांपर्यंत वीज पोहोचवणं, शहरीकरण, उद्योगांचा विस्तार, जीवनशैली सुधार यामुळे ऊर्जेची गरजही वेगाने वाढत असल्याचं राष्ट्रपतींनी सांगितलं आणि ऊर्जा बचतीचं महत्त्व अधोरेखित केलं.

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू***

ऊर्जेची बचत, नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचा वापर यामुळे कार्बन उत्सर्जन कमी करायलाही हातभार लागतो, ही बाब राष्ट्रपतींनी अधोरेखित केली. ऊर्जा संरक्षण आणि स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी भारत सरकारनं केलेल्या उपाययोजनांचा त्यांनी उल्लेख केला आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातलं उद्दिष्ट वेळेआधीच पूर्ण केल्याचं त्या म्हणाल्या. प्रधानमंत्री

सूर्यघर मोफत वीज योजना, राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन, पेट्रोलमध्ये इथेनॉलचं मिश्रण यासह आंतरराष्ट्रीय पातळीवर सरकार करत असलेल्या कामाबद्दलही त्यांनी सांगितलं. या प्रयत्नांमुळे वर्ष २०२३-२४ मध्ये ५ कोटी ३६ लाख टन तेलाची बचत झाल्याची माहिती राष्ट्रपतींनी दिली. ऊर्जा संक्रमणासाठी प्रत्येक क्षेत्राचा आणि नागरिकाचा, विशेषतः लहान मुलं आणि युवकांचा सहभाग आवश्यक आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं आणि त्यासाठी आपल्या वागणुकीत बदल करायचं आवाहन देशवासीयांना केलं. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल, ऊर्जा आणि नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक आणि इतर यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिनानिमित्त आज केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल, रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, ग्राहक कल्याण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्यासह विविध नेत्यांनी ऊर्जेचा अपव्यय टाळायचं आवाहन केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,उद्यापासून दोन दिवस जॉर्डनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. भारत आणि जॉर्डन यांच्यातल्या राजनैतिक संबंधांचं हे ७५वं वर्ष आहे. जॉर्डनकडून मिळणाऱ्या फॉस्फेटपासून भारतातल्या कृषी क्षेत्राला मिळणारी ऊर्जा, तसंच दोन्ही देशांमधले जवळचे सांस्कृतिक धागे यांच्या आधारावर दोन्ही देशांमधले संबंध आणखी बळकट होत आहेत. प्रधानमंत्री मोदी यांचा जॉर्डन दौरा म्हणजे व्यापार, अन्नसुरक्षा आणि दोन्ही देशांच्या नागरिकांमधल्या संबंधांसाठी एक मैलाचा दगड असल्याचं जॉर्डनमधले भारताचे राजदूत मनीष चौहान यांनी म्हटलं आहे. जॉर्डनचा दौरा आटोपून प्रधानमंत्री १६ आणि १७ डिसेंबर रोजी इथियोपियाला भेट देतील, त्यानंतर १७ आणि १८ तारखेला ते ओमानला जाणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय प्रतिनियुक्तीच्या महत्त्वाच्या पदांसाठी महिला तसंच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या वर्गांच्या अधिकाऱ्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे यासाठी या वर्गातल्या अधिकाऱ्यांची नामनिर्देशनं पाठवण्याचे निर्देश केंद्र सरकारनं राज्यसरकारांना दिले आहेत. यात किमान दोन वर्षे पदोन्नतीच्या कारणावरून परत बोलावलं जाण्याची

शक्यता नसलेल्या अधिकाऱ्यांचीच नामनिर्देशनं पाठवण्याची सूचना कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या वतीनं राज्य सरकारांच्या मुख्य सचिवांना देण्यात आली आहे.

<><><><><>

लोकप्रिय फूटबॉलपटू लिओनेल मेस्सीचा गोट इंडिया दौऱ्याचा कार्यक्रम काल हैद्राबाद इथं झाला. राजीव गांधी स्टेडियमवर झालेल्या या कार्यक्रमात मेस्सी सह द पॉल आणि सुआरेझ या आवडत्या खेळाडूंचं दर्शनही फुटबॉलप्रेमींना मिळालं. गोट चषक सामन्याच्या पेनल्टी शूटआऊटमधे त्यांनी भाग घेतला. तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी या कार्यक्रमाला उपस्थित होते. गोट चषक सामन्याच्या विजेत्यांना मेस्सीच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला. काही क्षणांसाठी मेसीनं फुटबॉलशी खेळत आपलं पदलालित्यही दाखवलं.

मेस्सी आणि त्याचे सवंगडी आज मुंबईला भेट देणार आहेत. या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबईतल्या मैदानाच्या आसपास कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

कोलकाता इथं सॉल्ट लेक मैदानावर मेस्सीच्या कार्यक्रमाच्या वेळी गैरप्रकार झाल्याबद्दल पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिलगिरी व्यक्त केली असून झाल्या प्रकाराची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या नेतृत्वात समिती नेमली आहे.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या मर्यादेच्या आतच महाराष्ट्र सरकारने कर्ज घेतलं असून राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी मुख्यमंत्री अंतिम आठवडा प्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देताना विधानसभेत बोलत होते. चालू आर्थिक वर्षातही राजकोषीय तूट तीन टक्क्याच्या आत ठेवण्यात यश येईल असा विश्वास व्यक्त करत, राज्य दिवाळखोरीकडे जात नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. देशातल्या मोठ्या राज्यांचा विचार केला असता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था आजही सर्व निकषांवर पात्र ठरणारी आहे, असं सांगून २०२९-३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><><>

महाराष्ट्रात गोंदिया इथं काल ३ माओवाद्यांनी जिल्हा पोलीसदलासमोर आत्मसमर्पण केलं. दरेकसा एरिया कमिटीचा कमांडर रोशन, आणि सहाय्यक कमांडर सुभाष आणि रतन या तिघांनी शस्त्रं पोलिसांच्या हवाली केली.

<><><><><>

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं आयोजित पुस्तक महोत्सवाचं उद्घाटन काल पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर झालं. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू सुरेश गोसावी, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे मिलिंद मराठे, संयोजक राजेश पांडे, प्रसिद्ध लेखक विश्वास पाटील यांच्यासह इतर यावेळी उपस्थित होते. हा महोत्सव येत्या २१ तारखेपर्यंत सुरु राहणार आहे. या महोत्सवात साडेतीनशे दालनं आहेत.

<><><><><>

खगोलप्रेमींना आज रात्री आकाशात उल्कावर्षावाचं अद्भुत दृष्य पाहायला मिळणार आहे. हा या वर्षातला सर्वात मोठा उल्कावर्षाव असून, रात्री सुमारे ९ वाजल्यापासून पहाटेपर्यंत दर तासाला १०० हून अधिक उल्का पडताना दिसू शकतात. हा उल्कावर्षाव मिथुन या तारकासमूहात होणार असल्यानं त्याला मिथुन उल्कावर्षाव असं नाव देण्यात आलं आहे. शहरातल्या कृत्रिम उजेडापासून दूर अंधारलेल्या निरभ्र आकाशात वायव्य दिशेला हा उल्कावर्षाव साध्या डोळ्यांनी पाहता येईल.

<><><><><>

पंजाबमधे आज १५३ पंचायतसमित्या आणि २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसाठी मतदान होत आहे. सकाळी ८ वाजता मतदानाला सुरुवात झाली, आणि ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत चालेल. संवेदनशील परिसरातल्या मतदान केंद्रांवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. येत्या बुधवारी, १७ डिसेंबरला मतमोजणी होईल.

<><><><><>

गाझा पट्टीत काल झालेल्या हल्ल्यात हमासच्या शस्त्रास्त्र निर्मिती विभागाचा प्रमुख 'राद साद' ठार झाल्याची माहिती इस्रायलने दिली आहे. सादने हमासच्या सैन्य उभारणीचं नेतृत्वही केलं होतं. दोन वर्षांपूर्वी ७ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर झालेल्या हल्ल्याच्या सूत्रधारांपैकी 'साद' हा एक होता. त्याच्यामुळेच गाझामध्ये युद्ध सुरू झाल्याचं इस्रायलचे

प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू आणि संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी आपल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघादरम्यानचा तिसरा टी-ट्वेंटी सामना आज धरमशाला इथं होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता सामना सुरू होईल. पाच सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकला आहे.

<><><><><>

19 वर्षांखालील क्रिकेट संघाच्या आशिया चषक स्पर्धेच्या गटस्तरीय फेरीतला दुसरा सामना आज भारत आणि पाकिस्तान दरम्यान दुबई इथं सुरु आहे. पाकिस्तान ने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.

शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा भारताच्या ३२ व्या षटकात ५ बाद १७३ धावा झाल्या होत्या..

<><><><><>

जागतिक स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत आज भारताचा सामना हाँगकाँगशी होणार आहे. काल झालेल्या उपांत्य सामन्यात भारतानं इजिप्तचा ३-० नं पराभव केला होता. तर हाँगकाँगनं जपानवर मात केली होती.

//<><><><><>//